# टीकाकारांकडून सर्व मर्यादांचे उल्लंघन

## मिस्री यांना ट्रोल केल्याबद्दल माजी अधिकाऱ्याकडून संताप व्यक्त

**नवी दिल्ली, ता. १२ (पीटीआय) : भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये शस्त्रसंधी झाल्याच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांना समाज माध्यमांवरून ट्रोल केले जात आहे. त्या पार्श्वभूमीवर माजी राजनैतिक अधिकारी निरुपमा मेनन राव तसेच एमआयएमचे नेते असदुद्दिन ओवेसी तसेच समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी मिस्री यांची पाठराखण केली आहे.**

### ‘टीका तत्काळ थांबवा’

- **मिस्री हे अत्यंत प्रामाणिकपणे देशसेवा करत आहेत, त्यामुळे त्यांची बदनामी करण्याचे काहीही कारण नाही, त्याच्यावर होणारी टीका तत्काळ थांबवली पाहिजे, आपल्या राजनैतिक अधिकाऱ्यांना अशा पद्धतीने दुखावणे अजिबात योग्य नाही, असे म्हणत राव यांनी, समाज माध्यमातून मिस्री यांना ट्रोल करणाऱ्यांना सुनावले.**

ऑपरेशन सिंदूर

अखिलेश यांनी ‘एक्स’ या समाज माध्यमातून दीर्घ पोस्ट लिहून, मिस्री यांच्यावर टीका करणाऱ्यांना सुनावले आहे. जे अधिकारी देशासाठी दिवसरात्र अविश्रांत परिश्रम घेत आहेत, त्यांचे मनोधैर्य अशा प्रकारच्या टीकेने खचते, असे अखिलेश यादव म्हणाले.

‘‘विक्रम मिस्री यांसारख्या एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यावर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर अशा पद्धतीने अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका करणे अत्यंत निंदनीय आणि सर्व मर्यादांचे उल्लंघन करणारे आहे,’’ असे मत माजी परराष्ट्र सचिव निरुपमा राव यांनी व्यक्त केले.



‘‘कोणताही निर्णय घेण्याची जबाबदारी ही सरकारची असते, सरकारी अधिकाऱ्याची नाही. काही समाजकंटक उघडपणे सर्व मर्यादा ओलांडून अत्यंत खालच्या भाषेत राजनैतिक अधिकारी आणि त्यांच्या कुटुंबीयांबाबत आक्षेपार्ह विधाने करत आहेत. मात्र, भाजप सरकार किंवा केंद्रातील कोणीही मंत्री त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहत भूमिका घेत नाहीये,’’ अशी खंत अखिलेश यांनी व्यक्त केली.

‘ऑपरेशन सिंदूर’ बाबतची सर्व माहिती मिस्री ,लष्करातील अधिकारी सोफिया कुरेशी हवाई दलातील अधिकारी व्योमिका सिंह यांच्याकडून देण्यात येत होती. भारत-पाक शस्त्रसंधीची माहितीही मिस्री यांनीच दिली. त्यानंतर समाजमाध्यमांमधून त्यांच्यावर टीका सुरू झाली.

### महिला आयोगाकडूनही तंबी

- **राष्ट्रीय महिला आयोगानेही ट्रोलरना तंबी दिली असून, वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्याच्या कुटुंबीयांची खासगी माहिती सार्वजनिक करणे हे अत्यंत निंदनीय कृत्य आणि खासगीपणाच्या अधिकाराचे उल्लंघनही आहे.अशा पद्धतीने केली जाणारी टीका खपवून घेतली जाणार नाही, असे महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.**

> विक्रम मिस्री हे अत्यंत सभ्य, सुसंस्कृत, प्रामाणिक आणि आपल्या देशासाठी अविश्रांत परिश्रम घेणारे अधिकारी आहेत. आपले अधिकारी हे सरकारच्या आधिपत्याखाली काम करतात त्यामुळे जे निर्णय सरकारकडून घेतले जातात त्यासाठी अधिकाऱ्यांना दोषी धरणे चुकीचे आहे.
> **-असदुद्दीन ओवेसी**, एमएआयएमचे प्रमुख

# पाकिस्तानला शस्त्रे पाठविली नाहीत : चीन

**बीजिंग, ता. १२ (पीटीआय) :** चीनने त्यांच्या लष्कराच्या मालवाहतूक विमानातून पाकला शस्त्रपुरवठा केल्याची माहिती खोटी असल्याचे चीनच्या ‘पीपल्स लिबरेशन आर्मी’ने (पीएलए) आज सांगितले. या अफवा पसरविणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाईचा, इशाराही चीनने दिला.

‘पीएलए’च्या हवाई दलाच्या ‘शिआन वाय-२०’ या वाहतूक विमानातून पाकला शस्त्रे पाठविण्यात आल्याची माहिती इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर पसरली असल्याचे लक्षात आल्यानंतर चीनने ही माहिती खोटी असल्याचे सांगितले आहे. ‘इंटरनेटही कायद्याच्या कक्षेतच आहे. सैन्यदलांसंबंधी अफवा पसरविणाऱ्यांविरोधात आम्ही कायदेशीर कारवाई करू,’ असे ‘पीएलए’ने स्पष्ट केले आहे. भारत आणि पाकिस्तानदरम्यान मागील आठवड्यात निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर चीनच्या या स्पष्टीकरणाला महत्त्व आले आहे.

स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार, चीन हा पाकचा सर्वांत मोठा शस्त्रपुरवठादार देश आहे. पाकिस्तानने आयात केलेल्या शस्त्रांपैकी ८१ टक्के आयात चीनकडून झाली आहे. यात लढाऊ विमाने, रडार, युद्धजहाजे, पाणबुड्या व क्षेपणास्त्रांचा समावेश आहे.

## पाकचे समर्थन करणाऱ्या युवकाला अटक

**संभळ :** पाकचे समर्थन करणारा व्हिडिओ फेसबुकवर शेअर केल्याबद्दल २७ वर्षीय युवकाला उत्तर प्रदेशात अटक करण्यात आली. भारताचे लढाऊ विमान राफेल पाकिस्तानने पाडल्याचा दावा त्याने या व्हिडिओत केला होता. जमात अली असे त्याचे नाव असून तो मुरादाबादपूरचा रहिवासी आहे. तपासादरम्यान त्याने फेसबुक अकाउंटवरून पाकिस्तानच्या समर्थनार्थ अनेक व्हिडिओ शेअर व लाईक केल्याचेही आढळले.

## उमर अब्दुल्लांनी घेतली पीडितांची भेट

**सकाळ न्यूज नेटवर्क**

**पूँच/जम्मू :** पाकिस्तानच्या गोळीबाराचा फटका बसलेल्या नागरिकांची जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी सोमवारी भेट घेतली. संबंधित प्रदेशात बंकर उभारण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. ‘ऑपरेशन सिंदूर’ नंतर पाकने केलेला गोळीबार व तोफगोळ्यांच्या माऱ्यात एकूण २७ नागरिकांचा मृत्यू झाला. यात एकट्या पूंचमधीलच २० जणांचा समावेश आहे. मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची भेट घेत अब्दुल्ला यांनी त्यांचे सांत्वन केले.

- **जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी सोमवारी पाकिस्तानच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या झाकिर हुसेन (वय ४५) यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. गोळीबारात हुसेन यांच्या मुलीसह अन्य एकाचाही मृत्यू झाला होता.**
- **जम्मूतील राजौरी जिल्ह्यात नागरी भागात पाकने डागलेले, न फुटलेले अनेक तोफगोळे सापडले.**
- **संरक्षण दलातील अधिकारी-जवानांच्या मालकीच्या आंध्र प्रदेशातील मालमत्तांना कर सवलत देण्याची उपमुख्यमंत्री पवनकल्याण यांची घोषणा. ग्रामपंचायत हद्दीत मालमत्ता असणाऱ्यांना लाभ होणार**
- **जम्मू आणि काश्मीरमधील आरएस पूरा सेक्टरमध्ये पाकच्या गोळीबारात हुतात्मा झालेले बीएसएफचे उपनिरीक्षक मोहम्मद इम्तियाज यांचे पार्थिव पाटणा विमानतळावर आणले. सारन जिल्ह्यातील नारायणपूर गावात अंत्यसंस्कार**
- **श्रीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळ पुन्हा सज्ज, विमानतळ प्राधिकरणाकडून नागरी विमान सेवा पुन्हा सुरू करण्याची घोषणा.**

# देशाच्या सुरक्षेसाठी दहा उपग्रह अखंड कार्यरत

## ‘इस्रो’च्या अध्यक्षांची माहिती



डॉ. व्ही. नारायणन

**इंफाळ, ता.१२ (पीटीआय) :** भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि संरक्षणासाठी दहा उपग्रह २४ तास निरीक्षण करीत आहेत, अशी माहिती ‘इस्रो’चे अध्यक्ष डॉ.व्ही. नारायणन यांनी दिली.

इंफाळमधील केंद्रीय कृषी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ते रविवारी (ता.११) बोलत होते. भारताची वाटचाल एक चैतन्यशील अवकाश शक्तीकडे सुरू असून २०४० पर्यंत आपले स्वतःचे अवकाश स्थानक तयार होणार आहे, असे डॉ.नारायणन यांनी सांगितले. ते म्हणाले, ‘‘भारतातून ३४ देशांचे ४३३ उपग्रह अवकाशात सोडून ते कक्षेत स्थापन करण्यात आले आहेत. देशातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी दहा उपग्रह आठवड्याचे सातही दिवस २४ तास सतत कार्यरत आहेत, हे सांगताना मला आनंद होत आहे.’’

भारत-पाकिस्तानमधील सध्याच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ‘इस्रो’च्या अध्यक्षांनी भारतीयांच्या सुरक्षेत उपग्रहांच्या योगदानाची माहिती दिली. डॉ.नारायणन म्हणाले, की आपल्या देशाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी आपल्याला उपग्रहांचा वापर करावा लागणार आहे.आपल्या सात हजार किलोमीटरच्या किनारपट्टीवर लक्ष ठेवावे लागणार आहे. संपूर्ण उत्तरेकडील भागाचे आपल्याला सतत निरीक्षण करावे लागेल. उपग्रह आणि ड्रोन तंत्रज्ञानाशिवाय आपण ते साध्य करू शकत नाही.’’

‘जी २०’ देशांसाठी हवामान बदलाचा आणि हवेच्या प्रदूषणाचा अभ्यास करण्यासाठी व हवामानाचे निरीक्षण करण्यासाठी भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) उपग्रह विकसित करीत आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने केलेली प्रगती अद्वितीय आणि उल्लेखनीय आहे, ’’ असे ते म्हणाले.

### डॉ. नारायणन म्हणाले...

- **देशात १९४७ मध्ये कोणताही अंतराळ कार्यक्रम नव्हता**
- **संपूर्ण अंतराळ उपक्रम १९६२ मध्ये सुरू झाला**
- **१९६९ हे वर्ष ऐतिहासिक होते. कारण त्याच वर्षी भारतीय अंतराळ संशोधन संघटनेची स्थापना झाली**
- **आपण १९७५ मध्ये पहिला उपग्रह विकसित केला**
- **यान प्रक्षेपकांची एक नवी श्रेणी आपण विकसित केली आहे**
- **आतापर्यंत आपण विविध प्रकारचे आणि क्षमतेचे १३१ उपग्रहांची निर्मिती केली आहे**
- **भारत आणि अमेरिका संयुक्तपणे एक खर्चिक आणि प्रगत पृथ्वी निरीक्षण उपग्रह तयार करणार असून तो भारतातून प्रक्षेपित केला जाईल**



**जम्मू :** सीमा सुरक्षा दलाचे जवान दीपक चिंगाखाम यांना नियंत्रण रेषेवर कर्तव्य बजावत असताना वीरमरण आले. त्यांना श्रद्धांजली वाहताना सीमा सुरक्षा दलाचे जवान.

# संरक्षण दलांबरोबर समन्वयाने काम करू

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; राज्य सरकारची वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता.१२ : भारत आणि पाकिस्तान मधील तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दले आणि राज्य सरकार यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झाली. या बैठकीत राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत राज्यातील सुरक्षेवर आणि सज्जतेवर झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सुद्धा उपस्थित होते. भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चड्ढा, कर्नल संदीप सील, भारतीय नौदलातर्फे रियर ॲडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर व्हाइस मार्शल रजत मोहन हे बैठकीला उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची यावर बैठकीत झाली. संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर चर्चा झाली.



यावेळी फडणवीस म्हणाले, ‘‘भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदूर राबविले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलाला मी सॅल्युट करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारताची आर्थिक राजधानी आहे. यापूर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणाऱ्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. राज्य सरकारचे आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून समन्वयाने काम करुया.’’

या बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री सचिवालयातील सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारीसुद्धा उपस्थित होते.

# भाजपची आजपासून देशभर तिरंगा यात्रा

**सकाळ न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली, ता. १२ :** पाकिस्तानरोधात राबविण्यात आलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’च्या यशाची माहिती देशाच्या कानाकोपऱ्यात पोचविण्याच्या उद्देशाने भाजपकडून १३ ते २३ मे या कालावधीत तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय एकता आणि तिरंगा ध्वजाचा सन्मान वाढविण्याचा दृष्टिकोन देखील या यात्रेमागे असल्याचे पक्ष सूत्रांकडून सोमवारी सांगण्यात आले. केंद्र आणि राज्यातील मंत्री, भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आमदार, खासदार, अन्य पदाधिकारी तसेच सर्व स्तरावरील कार्यकर्ते तिरंगा यात्रेत सहभागी होणार आहेत.

पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने ‘ऑपरेशन सिंदूर’ ही मोहीम हाती घेत, पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधले नऊ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. त्यानंतर पाकने केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल भारतीय संरक्षण दलांनी त्यांच्या ११ हवाई तळांवर हल्ले करत ते उद्ध्वस्त केले . या सर्व घडामोडींची आणि देशाच्या संरक्षण दलांची यशोगाथा या तिरंगा यात्राच्या माध्यमातून सांगण्यात येणार आहे.

### ‘चुकीचे दावे खोडून काढा’

- **‘ऑपरेशन सिंदूर’च्या अनुषंगाने काही लोकांकडून चुकीची माहिती पसरवली जात आहे. ही माहिती यात्रेदरम्यान खोडून काढण्याचे निर्देश पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी अलीकडेच झालेल्या बैठकीत वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना दिल्याचे सूत्रांनी सांगितले. तिरंगा यात्रेच्या समन्वयाची जबाबदारी विनोद तावडे, संबित पात्रा, तरुण चुघ या वरिष्ठ नेत्यांकडे सोपविण्यात आली आहे.**

## दृष्टिक्षेपात

### कुर्दिश बंडखोरांचा लढा संपुष्टात

**अंकारा :** तुर्कीये सरकारविरोधात गेल्या ४० वर्षांपासूनचा लढा थांबविण्याची घोषणा करीत कुर्दिस्तान वर्कर्स पार्टी (पीकेके) या बंदी असलेल्या संघटनेने सोमवारी शस्त्रास्त्रे खाली ठेवली. या गटाचा नेता अब्दुल्ला ओकलन याने संघटना बरखास्त करण्याचे आवाहन तुरुंगातून फेब्रुवारीमध्ये केले होते. त्यानंतर आज ही घोषणा करण्यात आली. या संघटनेचे बंड सुरू झाल्यापासून ४० हजार हून अधिक लोक मारले गेले आहेत.

### समोरासमोर चर्चा करा : झेलेन्स्की

**किव्ह :** संघर्ष थांबविण्याबाबत चर्चा करण्यासाठी तुर्कियेमध्ये पुढील आठवड्यात समोरासमोर भेटा, असे आवाहन युक्रेनचे अध्यक्ष व्होलोदीमिर झेलेन्स्की यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन यांना दिले आहे. दोन्ही देशांमध्ये चर्चा घडवून आणण्यासाठी अमेरिका व युरोपीय महासंघ प्रयत्न करत आहे. मात्र, तीस दिवसांच्या शस्त्रसंधीचा त्यांनी ठेवलेला प्रस्ताव पुतीन यांनी धुडकावून लावला.

# ‘अदानी गैरव्यवहारावर पडदा टाकता येणार नाही’

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. १२ : सोलार एनर्जी कॉर्पोरेशनच्या (एसईसीआय) अध्यक्षपदावरुन आर. पी. गुप्ता यांची केंद्र सरकारने हकालपट्टी केल्यानंतर राजकीय क्षेत्रात त्याचे पडसाद उमटत आहेत. गुप्ता यांना बरखास्त करण्यात आले असले तरी अदानी गैरव्यवहारावर पडदा टाकला जाऊ शकत नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेस राष्ट्रीय सरचिटणीय जयराम रमेश यांनी दिली आहे.

गुप्ता यांची २०२३ मध्ये एसईसीआयच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली होती. अमेरिकन प्रशासनाने नोव्हेंबर २०२४ मध्ये एसईसीआयवर गंभीर आरोप केले होते आणि हे प्रकरण उद्योगपती गौतम अदानी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांशी जोडले गेले होते. एसईसीआयच्या शिफारशीनुसार अनेक राज्यांनी अदानी समूहासोबत खरेदी करार केला होता. हे करार पार पाडण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना २ हजार २९ कोटी रुपयांची लाच देऊ केल्याचा आरोप याआधी झालेला आहे. या आरोपानंतर डिसेंबर २०२४ पासून एसईसीआयने उर्जाविषयक टेंडर जारी करण्याच्या पध्दतीत बदल केला होता, असे जयराम रमेश यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सांगितले. अमेरिकन सिक्युरिटीज अँड एक्सचेंज कमिशनने आरोपींना समन्स बजावण्याबाबत भारत सरकारकडे विनंती केली आहे. मात्र केंद्राने यूएस एसईसीला अद्याप कोणतेही उत्तर दिलेले नाही, असा आरोप रमेश यानी केला.

## देशद्रोही पोस्टप्रकरणी चौदा जणांवर गुन्हा

**अहमदाबाद, ता. १२ (पीटीआय):** भारतीय लष्कराने दहशतवादी तळांवर कारवाई केल्यानंतर राज्यात काही समाजकंटकांनी सोशल मीडियावर देशविरोधी आणि लष्कराच्या मनौधैर्यावर परिणाम करणारा मजकूर व्हायरल केला. याप्रकरणी गुजरात पोलिसांनी चौदा जणांवर गुन्हे नोंदवले.

# ट्रक-ट्रेलरच्या धडकेत १३ जण ठार; १४ जखमी

**रायपूर, ता. १२ (पीटीआय) :** छत्तीसगडची राजधानी रायपूरमध्ये ट्रक आणि ट्रेलरची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात १३ जण ठार झाले. इतर १४ जखमी झाले. मृतांत चार मुले व नऊ महिलांचा समावेश आहे.

रायपूर-बलोदाबाजार रस्त्यावर सारगावजवळ रविवारी (ता.११) रात्री हा अपघात झाला. बाना-बन्सारी गावातील विवाह सभारंभाहून ३५ जण ट्रकमधून परतत होते. त्यांच्या ट्रकने समोरून येणाऱ्या ट्रेलरला जोरदार धडक दिली. त्यानंतर ट्रक दुसऱ्या अवजड वाहनाला धडकला व अपघात झाला.

# सुरक्षित रस्ता अन् वाहनांचा वेग कमी हवा

**नवी दिल्ली, ता. १२ (पीटीआय):** जगातील प्रामुख्याने आग्नेय आशियातील वाढत्या अपघाताचे प्रमाण पाहता संबंधित देशांनी बहुपयोगी आणि जनताभिमुख वाहतूक धोरण आखण्याचे आवाहन जागतिक आरोग्य संघटनेने केले आहे. आठव्या संयुक्त राष्ट्र रस्ते सुरक्षा सप्ताहानिमित्त देशातील रस्ते सुरक्षित करण्याच्या दृष्टीने रचना करणे आणि वाहनांचा वेग कमी राहावा यासाठी पुढाकार घ्यावा, असेही म्हटले आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या वतीने दर दोन वर्षांनी रस्ते सुरक्षा आठवडा साजरा करण्यात येतो. मे महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी सप्ताहास सुरुवात होते. या वर्षीचा अजेंडा पदपथावरून चालणाऱ्यांचा आणि सायकल प्रवास करणाऱ्यांचे आयुष्य सुरक्षित करणे. पायी चालणे आणि सायकल चालवणे हे रस्ते सुरक्षा दशक २०२०-२०३०’’ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या योजनेचा महत्त्वाचा भाग आहे, असे ‘हू’च्या आग्नेय आशिया विभागाच्या प्रादेशिक संचालक सायमा वाजेद यांनी सांगितले. पादचारी आणि सायकलस्वारांना सुरक्षितता प्रदान करण्याचा उपक्रम आरोग्यदायी, शाश्वत शहरे आणि जीवनशैलीला प्रोत्साहन देतात, असे त्या म्हणाल्या.

### सायकलस्वारांना फटका

अपघातांमध्ये पादचारी आणि सायकलस्वारांचे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे हे केवळ जीव वाचवण्यापुरते मर्यादित नाही, तर शारीरिक हालचालींसाठी करत असलेल्या त्यांच्या उपक्रमाला प्रोत्साहन देणेही तितकेच आवश्यक आहे. पायी चालल्याने आणि सायकल चालविल्याने हृदयरोग, स्ट्रोक, मधुमेह आणि कर्करोग यांसारख्या आजारांपासून बचाव होतो. शिवाय मानसिक आरोग्यही सुधारते व नैराश्य व चिंता कमी होते, असे वाझेद म्हणाल्या. रस्ता सुरक्षा उपक्रम हा ‘हू’च्या भविष्यातील आरोग्यदायी शहरे विकसित करण्याच्या दृष्टीने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा भाग आहे. आग्नेय आशिया विभागात जागतिक आरोग्य संघटनेने हेल्दी सिटीजच्या मदतीने मुंबई आणि बँकॉकसारख्या महानगरांमध्ये रस्ता सुरक्षा सुधारण्यासाठी मोठे काम केले. यामध्ये शेकडो किलोमीटर रस्ते व फूटपाथचे परीक्षण करून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित व समावेशक डिझाईन तयार करण्यात आले , अशी माहिती वाझेद यांनी दिली.

### रस्त्यांची सुरक्षित रचना

आग्नेय आशियातील प्रचंड लोकसंख्येच्या शहरांमध्ये सर्वांसाठी सुरक्षित, समावेशक रस्ते तयार करणे हे एक मोठे आव्हान आहे,’ असे त्या म्हणाल्या. यात यश आल्यास आरोग्यदायी समाज, सुरक्षितता व पर्यावरणस्नेही विकासाला चालना मिळेल. रस्ते सुरक्षेवर भर दिल्यास आणि आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या पादचाऱ्यांना प्रोत्साहन दिल्यास शारीरिक आजार, मानसिक आरोग्य व हवामान बदल यांसारखी आव्हाने हाताळता येणे शक्य आहे. सदस्य देशांनी जनताभिमुख वाहतूक धोरण, रस्त्यांची सुरक्षित रचना, सुरक्षित वाहनांबरोबरच गाडीचा वेग कमी राहावा यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

Godrej Finance Limited
गोदरेज फायनान्स लिमिटेड
Godrej | FINANCE
गोदरेज | फायनान्स

सार्वजनिक सूचना

**‘गोदरेज फायनान्स लिमिटेड’ द्वारे मास्टर डायरेक्शन - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - स्केल बेस्ड रेग्युलेशन) निर्देश, २०२३ च्या परिच्छेद ४३ नुसार सार्वजनिक सूचना**

**गोदरेज फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "GFL") ही कंपनी कायदा, १९५६ (कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U67120MH1992PLC065457) अंतर्गत स्थापन झालेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे आणि ती भारतीय रिझर्व्ह बँकेत (COR. क्रमांक: १३.००३६८) नॉन-डिपॉझिट, नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी ("NBFC") म्हणून नोंदणीकृत आहे. GFL चे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज वन, पिरोजनगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००७९, महाराष्ट्र येथे आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनी तिचे शाखा कार्यालय वाबी साबी को-वर्किंग, बँक ऑफ बडोदा समोर, म्हस्के पेट्रोल पंप जवळ, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजी नगर, ४३१०१० महाराष्ट्र येथून बिझ स्क्वेअर- तिसरा मजला, युनिट क्रमांक ३०१-३०२, प्लॉट क्रमांक ८, ९ आणि १३ ते १६, गट क्रमांक ५८ , बीड बायपास रोड, छत्रपती संभाजी नगर, ४३१००५ महाराष्ट्र येथे कामकाजाच्या कारणास्तव या सूचनेच्या तारखेपासून ३ महिन्यांपर्यंत स्तलांतरित करण्यात येणार आहे.

ग्राहकांच्या सर्व शंका customercare@godrejcapital.com या इमेल आयडीवर संबोधित केल्या जातील.

या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात श्री. योगेश जैन, मुख्य अनुपालन अधिकारी यांना पाठवलेल्या या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत किंवा gfl.compliance@godrejfinance.com वर संपर्क साधता येईल

एसडी/-
**गोदरेज फायनान्स लिमिटेडच्या वतीने**

स्थळ: मुंबई
दिनांक: 13/05/2025